# नियमित कार्यक्रम अहवाल ( सत्र २०२४-२५)

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) ही भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयांतर्गत चालविण्यात येणारी एक महत्वाची स्वयंसेवी योजना आहे. या योजनेचा उद्देश महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, सेवा वृत्ती, शिस्त, नेतृत्वगुण व कार्यकुशलता विकसित करणे हा आहे. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील NSS युनिटने शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये विविध उपक्रमांद्वारे या उद्दिष्टांची प्रभावीपणे पूर्तता केली.

## 1 हर घर तिरंगा अभियान

श्री शिवाजी विद्यालय महाविद्यालय अमरावती येथे स्वातंत्र्य दिनाचा सप्ताह हा हर घर हहर घर तिरंगा म्हणून साजरा करण्यात आला. त्या अंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना सेल्फी विथ तिरंगा, त्याच प्रमाणे प्रत्येकाने आपल्या घरी एक तिरंगा लावावा या प्रकारे हा कार्यक्रम राबवण्यात आला. विद्यार्थ्यांनी काढलेल्या सेल्फी ह्या सर्व महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ग्रुपवर टाकण्यात आला व राष्ट्रभक्तीची शपथ घेण्यात आली.

## 2 एक पेड मा के नाम

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी जनजागृती निर्माण व्हावी व त्याचप्रमाणे झाडांचे पर्यावरणातील महत्त्व कळावे याकरता केंद्र शासनाने राबवलेल्या एक पेड मा के नाम या अभियानाची सुरुवात स्वतंत्र दिनी म्हणजेच 15 ऑगस्ट 2024 रोजी महाविद्यालयात करण्यात आली. त्याअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला एक एक वृक्ष वाटप करण्यात आला व त्यांनी ते आपल्या शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या परिसरात लावण्याचे आव्हान करण्यात आले. त्याचप्रमाणे त्या वृक्षाचे जतन करणे ही त्या विद्यार्थ्यांची

जबाबदारी म्हणून त्याला सांगण्यात आले.सदर अभियान अंतर्गत महाविद्यालयीन परिसरात त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या घराच्या परिसरात वृक्षलागवड करण्यात आली.

## 3. आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम

सभोतालच्या जगतात घडत असलेल्या वेगवेगळ्या भौगोलिक तसेच मानवनिर्मित कारणामुळे उद्भवलेल्या आपत्तीला यशस्वीरित्या स्वयंसेवकांनी सामोरे जावे. याकरिता महाविद्यालयामध्ये दिनांक 11 ऑगस्ट 2024 रोजी आपत्ती व्यवस्थापनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आग विझवण्याचे त्याचबरोबर स्वतःचे रक्षण कसे करावे या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

## 4. हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभाग

संपूर्ण महाराष्ट्र राज्य भर व्याप्ती असलेल्या हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन अमरावती शहरामध्ये 28 सप्टेंबर 2024 रोजी करण्यात आले होते. यामध्ये विविध वर्गवारी नुसार लहान मुलांपासून ते अगदी वयोवृद्ध लोकांपर्यंत वेगवेगळ्या गटात मध्ये स्पर्धक भाग घेऊ शकत होते. सदर स्पर्धेला मदत म्हणून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे स्वयंस सेवक यांनी दोन दिवस सतत सहभाग नोंदविला व या स्पर्धेचे यशस्वीरीत्या आयोजन होण्यास हातभार लावला.

## 5. चिन्मय मिशन गीतापठण स्पर्धा

चिन्मय मिशन अंतर्गत दरवर्षी विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचा व त्या अनुषंगाने भारतीय परंपरेचा अभ्यास व्हावा याकरिता गीतापटन स्पर्धेचे आयोजन हे विविध गटातील विद्यार्थ्यांकरिता केले जाते व त्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी पर्यवेक्षक म्हणून दिनांक 24 नोव्हेंबर 2024 रोजी सहकार्य केले व सतत सहकार्य करून सदर स्पर्धा सदर स्पर्धेचे यशस्वीरितरीत्या आयोजन केले.

## 6. मतदार जनजागृती व नोंदणी कार्यक्रम

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आणि पर्यायी महाराष्ट्र शासनाच्या जिल्हाधिकारी अमरावती व जिल्हा निवडणूक अधिकारी अमरावती यांच्या प्राप्त झालेल्या पत्रानुसार मतदान जनजागृती होण्याकरिता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे पोस्टर तयार करून त्याचप्रमाणे पथनाट्याचे आयोजन करून समाजामध्ये मतदाना प्रती जनजागृती केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी ग्राम शिराळा तसेच अमरावतीतील इर्विन चौक, राजकमल चौक येथे मतदान जनजागृती व्हावी या दृष्टीने पथनाट्याचे सादरीकरण करून मतदानाचे महत्त्व लोकांना समजावून दिले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य जी. व्ही. कोरपे, डॉ. प्रशांत मंडलिक व इतर सर्व प्राध्यापक वर्ग प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे बहुसंख्येने स्वयंसेवक देखील उपस्थित होते. याप्रसंगी आयोजित मतदान जनजागृती तिरंगा महा रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व बहुसंख्येने प्राध्यापक देखील सामील झाले.

## 7 . वृक्षदिंडी चे आयोजन

वनसंवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, पर्यावरण रक्षणाबाबत समाजात जनजागृती व्हावी, तसेच वृक्ष लागवडीच्या उपक्रमात सामूहिक सहभाग वाढावा यासाठी शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे जुलै २०२४ रोजी वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम राष्ट्रीय सेवा योजना व वनस्पती शास्त्र विभाग तसेच पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणातून करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी व्ही कोळपे उपस्थित होते. त्याचबरोबर वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. खेडकर आणि इतर सर्व प्राध्यापक वर्ग देखील उपस्थित होता. या वृक्षदिंडीमध्ये १०० पेक्षा अधिक राष्ट्रीय

सेवा योजनेचे स्वयंसेवक, शिक्षक व कर्मचारी वर्ग सहभागी झाला. दिंडीमध्ये पर्यावरण विषयक फलक, घोषवाक्य व बॅनर घेऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. दिंडीचा मार्ग महाविद्यालयात ते जवळील सार्वजनिक परिसरापर्यंत होता, तिथे वृक्ष लागवड देखील करण्यात आली. एकूण १५० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. आवळा, गुलमोहर, सीताफळ यासारख्या वृक्षांची निवड स्थानिक हवामान व जमिनीच्या प्रकारानुसार केली गेली होती. विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन व संवर्धनाचे संकल्पही घेतले

## 8. वन्य दिनानिमित्त जलपात्राचे वाटप

शिवाजी विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना आणि वनविभाग अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक चिमणी दिन व वन्य दिन निमित्ताने दिनांक २१ रोजी अमरावती शहरातील ऑक्सिजन पार्क येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी जलपात्राचे वाटप केले. विद्यार्थ्यांनी जलपात्राचे वाटप समाजातील विविध भागातील जनतेला केले आणि जलपात्राचे महत्त्व पक्षांसाठी कसे आहे हे समजावून सांगितले. निसर्गात मुक्त बागडणारे विविध पक्षी हे निसर्गाच्या समतोल साखळीचे मुख्य घटक आहेत. वनसंवर्धनासाठी वृक्षारोपण व पक्षी संवर्धनाचे आवाहन समाजाला करता यावे या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बहुसंख्येने NSS विद्यार्थी आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. हर्षाली वानखडे, विक्रांत बुटे, डॉ. राधिका देशमुख तसेच विभागीय वन अधिकारी किरण पाटील आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

## 9. महिला सक्षमीकरण व सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेविषयी समाजात जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने श्री शिवाजी सायन्स कॉलेज, अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे इरविन चौक, राजापेठ व संत गाडगेबाबा मंदिर परिसरात जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनाच्या विद्यार्थिनींनी प्रभावी पथनाट्य (स्ट्रीट प्ले) व नृत्य सादरीकरण करून महिलांवरील अन्याय, छेडछाड, आत्मरक्षण व स्त्री-सन्मान या मुद्यांवर सामाजिक संदेश दिला. जनतेने या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद दिला असून स्थानिक टीव्ही मिडियावर या उपक्रमाचे विशेष प्रसारण करण्यात आले. विद्यार्थिनींच्या सादरीकरणाने नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण झाली व समाजात महिला सन्मानाचा संदेश

पोहोचवण्यात यश मिळाले.  विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभागातून आपल्या कलागुणांचा उपयोग करून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला.

## 10. स्वच्छ भारत अभियान

स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत दिनांक **२ ऑक्टोबर २०२४**, **महात्मा गांधी जयंती** निमित्त **श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती** येथे **विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन** करण्यात आले. या उपक्रमात महाविद्यालय परिसरासह परिसरातील सार्वजनिक ठिकाणीही स्वच्छता अभियान राबवण्यात आले.स्वयंसेवकांनी **वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, प्रशासकीय विभाग, बाग, फलक, पायऱ्या** इत्यादी ठिकाणांची तात्पुरती नव्हे तर समर्पितपणे साफसफाई केली. तसेच महाविद्यालय परिसरालगतचे **रस्ते, बसथांबे** व इतर सार्वजनिक स्थळांवर **स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी संदेश फलक व घोषवाक्य** लावण्यात आले. **स्वच्छतेबाबत सामाजिक भान निर्माण करणे**, **विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना जागृत करणे** उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमादरम्यान स्वयंसेवकांनी "**स्वच्छता ही सेवा**", "**गांधी विचार – स्वच्छ व्यवहार**" अशा घोषवाक्यांनी परिसर दुमदुमवला.या मोहिमेने केवळ परिसरच नव्हे, तर विचारांमध्येही स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले.

## 11. थोर महापुरुषांची जयंती साजरीकरण

थोर महापुरुषांची जयंती  साजरण्याचा खरा हेतू म्हणजे त्यांच्या कार्याचे स्मरण करून विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा व सद्‌गुणांची जाणीव निर्माण करणे होय. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचा परिचय होतो आणि त्यांच्या विचारधारेचा प्रभाव मनावर उमटतो. अशा कार्यक्रमांमुळे सामाजिक भान, सेवा वृत्ती, नैतिक मूल्ये आणि राष्ट्राभिमानाची भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजते. शिवाय, नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी व चारित्र्यविकास यांसारख्या गुणांचा विकास होतो. अशा कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना आदर्श व्यक्तिमत्त्वांची ओळख होते व त्यांच्या जीवनातील संघर्ष, त्याग व कर्तृत्वातून शिकण्याची संधी मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांसारख्या थोर नेत्यांचे विचार हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी दिशादर्शक

ठरतात. या स्मृतिदिनांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, सेवा-भावना, सामाजिक उत्तरदायित्व व एकात्मतेचे बळ निर्माण होते. हे केवळ औपचारिक कार्यक्रम नसून, भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचा एक महत्वाचा टप्पा .

# हर घर तिरंगा अभियान




# हर घर तिरंगा अभियान



**श्री क्षेत्रअंबादेवी परिसरात नवरात्राच्या दिनी स्वच्छता अभियान**




**श्री क्षेत्रअंबादेवी परिसरात नवरात्राच्या दिनी स्वच्छता अभियान**



**हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभाग**




**हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभाग**



थोर महापुरुषांना अभिनंदन करताना प्राचार्य




थोर महापुरुषांना अभिनंदन करताना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी



शिक्षक दिनाचा कार्यक्रम साजरा करताना विद्यार्थी




थोर महापुरुषांना अभिनंदन करताना प्राचार्य



# हर घर तिरंगा अभियान




# स्वच्छता अभियान



## मतदार जनजागृती व नोंदणी कार्यक्रम



## मतदान जनजागृती करिता स्वाक्षरी अभियान



## मतदान जनजागृती तिरंगा महा रॅली




## मतदान जनजागृती तिरंगा महा रॅली



एक पेड मा के नाम अभियाना अंतर्गत  रोपटे वाटप



एक पेड मा के नाम अंतर्गत वृक्षदिंडी



## जागतिक वन्य दिनानिमित्त जल तसेच प्राणी बचाव करिता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



## जागतिक वन्य दिनानिमित्त जल तसेच प्राणी बचाव मोहीम



# वन्य दिनानिमित्त जलपात्राचे वाटप





## अधिकारी-कर्मियो समेत विद्यार्थियो ने सिखे पक्षी संवर्धन के पाठ

### वन्यदिन निमित्त जलपात्र का वितरण

अमरावती। मंगल प्रहर ब्यूरो

वनविभाग की ओर से गुरुवार को विश्व गौरय्या दिन व वन्यदिन के उपलक्ष्य में मुख्य वनसंरक्षक कार्यालय में विभागीय वनअधिकारी किरण पाटिल के हाथो सभी अधिकारी-कर्मियो में जलपात्र का वितरण किया गया। ऑक्सिजन पार्क में भी विद्यार्थियों में जलपात्र का वितरण किया गया। इस कार्यक्रम के दौरान अधिकारी-कर्मियों समेत विद्यार्थियो ने पक्षी संवर्धन का पाठ भी **शेष पृष्ठ 2 पर**

### वन व पक्षी संवर्धन की अपील

विभागीय वनअधिकारी (दक्षता) किरण पाटिल ने बताया की वन व पक्षी संवर्धन से पर्यावरण की समानता रह सकती है। ग्रीष्मकाल में पानी का स्त्रोत घटने से पक्षियों को पानी के लिए शहर की दिशा में आना पडता है। ऐसे समय पक्षियों को पानी उपलब्ध होने पर उनकी मृत्यु पर अंकुश लगाया जा सकता। ग्रीष्मकाल में पक्षियों के लिए पानी की व्यवस्था हो इसके लिए नागरिको से अपील भी की। साथ ही वन व पक्षी संवर्धन का संदेश देने के साथ मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक कार्यालय के अधिनस्त सहयोगियो ने जलपात्र वितरण का कार्यक्रम लिया गया।

### कृत्रिम जलाशय की आवश्यकता बढी

डॉ. राधिका देशमुख ने कहा की बढते शहरीकरण व औद्योगीकरण के कारण जंगल की कटाई हो रही है। नतीजतन पशु पक्षी व मानव का जीवन खतरे में है। जंगल नष्ट हो रहे है, पर्यावरण का संतुलन बिगड रहा है। तापमान में वृध्दि के कारण ग्लोबल वार्मिंग का प्रश्न निर्माण हुआ, साथ ही पक्षियो का प्रमाण भी तेज गति से कम हुआ। पशु-पक्षियो को पानी व अन्न नहीं मिल रहा। जलपात्र अथवा पानी के विविध उपकरण उपलब्ध कर इसके अलावा आधुनिक संसाधनो का इस्तेमाल कर कृत्रिम रुप में पक्षियों के घोसले बनाने पर भी विचार होना जरुरी है। लोगों को किस प्रकार जागरुक किया जा सकता इस दिशा में प्रयत्न जरुरी है।



## अधिकारी-कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांनी गिरवले पक्षी संवर्धनाचे धडे

### वन्य दिनानिमित्त जलपात्र वाटप; ठिकठिकाणी कार्यक्रम

### स्वतःपासून सुरुवात

### कृत्रिम पाणवठ्यांची आवश्यकता वाढली

नमस्कार अमरावती

## महिला सक्षमीकरण व सुरक्षा जनजागृती कार्यक्रम



